ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

# विकसनशील भारतात ग्रामीण विकासाचे महत्व

श्री.विलास बापूरावजी कांबळे
(सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग )
व्ही.एम.व्ही.वाणिज्य ,जे.एम.टी. कला व जे.जे.पी.विज्ञान
महाविद्यालय वर्धमान नगर नागपूर
Email: vilaskamble38@gmail.com

---

## गोषवारा

आधारभूत संरचना किंवा पायाभूत संरचना हे आर्थिक विकासाचे प्रमुख साधन आहे. देशाचा आर्थिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक विकास ज्या घटकावर अवलंबून असतो त्या सर्व घटकांचा समावेश पायाभूत क्षेत्रात केला जातो हे घटक उत्पादन कार्यात प्रत्यक्षपने मदत करीत नाही तर अप्रत्यक्षपने मदत करीत असतात. वाहतूक, दळणवळण, विजपूरवठा, पाणीपुरवठा, वित्तपूरवठा यांच्या सोयी उत्पादनासाठी आवश्यक असतात. उत्पादन कार्यात हे घटक अप्रत्यक्षरितीने सहभाग घेत असतात त्यांना आधारभूत संरचनेचे घटक म्हणतात. ग्रामिण भागाच्या विकासासाठीही आधारभूत संरचनेचे घटक महत्वाचे असतात. भारतातील जवळ जवळ 70 प्रतिशत भाग हा ग्रामीण भाग आहे. ग्रामिण भागातील प्रमुख व्यवसाय शेती आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी तेथे प्रर्याप्त प्रमाणात आधारभूत संरचनेच्या सोयी असने आवश्यक आहे. पंचवार्षिक नियोजन काळात महाराष्ट्र सरकारने मोठ्या प्रमानात पायाभूत सुविधा विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. निरंतर आर्थिक विकासाचा दर वाढविण्याकरीता आधारभूत संरचनेमध्ये ग्रामीण विकास हा घटक महत्वाचा असला तरी अर्थव्यवस्थेचा विभिन्न क्षेत्रामध्ये ग्रामीण क्षेत्राचे अनन्य साधारण महत्व असल्याचे दिसून येते.भारताच्या आर्थिक नियोजनात ग्रामीण क्षेत्राच्या आणि ग्रामीण लोकांच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. देश अधिक समृध्द करावयाचा असेल तर ग्रामीण क्षेत्राचा शाश्वत विकास अनिवार्य आहे. ग्रामीण विकासात ग्रामीण जनतेच्या सामाजिक आर्थिक स्थितीत सुधारणा घडून येते.

**मुख्य शब्द :** ग्रामीण विकास ,आर्थिक विकास,आधारभूत संरचना,शेती

**प्रास्ताविक:**

ग्रामीण विकास ही अशी क्रिया आहे की ज्यामुळे मानवी कल्याण,जीवनमान शैक्षणिक स्तर यामध्ये भर पडते आणि सामुहिक प्रक्रियेद्वारे ग्रामीण जनतेला आत्मनिर्भरतेची जाणीव होते.ग्रामीण असे क्षेत्र की ज्या क्षेत्रातील अधिकतर लोक शेती व्यवसायात कार्यरत असतात. हे लोक निसर्गाच्या

*Research Paper* © 2012 IJFANS. All Rights Reserved, 

सहकार्याने प्रत्यक्षपणे वस्तूंचे उत्पादन करतात. ग्रामीण भागातील शेतकरी मुख्यत: पिकांचे व अन्नधान्याचे उत्पादन करतात. ग्रामीण समाज म्हणजे ज्या क्षेत्रातील लोकसंख्या कमी असते. सामाजिक भेदभाव कमी असतो. सामाजिक गतीक्षमता कमी असते आणि सामाजिक परिवर्तनाचा दर फारच कमी असतो.विकासाचा संबंध वाढ, प्रगतीशी असलेला दिसून येतो. ही वाढ किंवा प्रगती हळूहळू आणि सतत अवस्थेतून होत असते. विकासामध्ये होणाराबदल अधिक कार्यक्षम आणि गुंतागुंतीचा असतो.आजही भारतातील ६८ टक्के लोकहे ग्रामीण भागात राहतात. शहरी विकास हा ग्रामीण क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो. ग्रामीण विकासाच्या मार्गात अनेक समस्या आहेत. ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात आधारभूत संरचनांचा विकास अजूनही परिपूर्ण झालेला नाही. आजही तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये उपयोग फारसा दिसून येत नाही.तसेच आजही ग्रामीण भागात मूलभूत गरजांची योग्य प्रमाणात परिपूर्ण होत नाही. ग्रामीण विकासाच्या योजनांचे लाभ गरीबांपर्यंत पोहोचत नाहीत.

**अर्थ व व्याख्या-**

१) हॅरिसनच्या मते ग्रामीण विकासाचा दोन दृष्टीने विचार केला जातो "ग्रामीण विकास म्हणजे सरकार प्रणित कार्ये की ज्यांचा भर विकास धोरणाका असतो. व्यापक अर्थाने ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण समाजातील बदलांची प्रक्रिया असून ज्यामध्ये सरकारचा हस्तक्षेप असतो आणि नसतो. जर सरकारचा हस्तक्षेप नसेल तर त्याला आपण ग्रामीण विकासाचा निर्हस्तक्षेप दृष्टिकोन म्हण शकतो."

२) अग्रवाल यांच्या मते, "ग्रामीण विकास असे धोरण होय की ज्याद्वारे ग्रामीण तुलना करता ग्रामीण विकास ही नवीन संकल्पना आहे. १९६० च्या दशकात ग्रामीण अनतेच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा घडून येते."

३) जागतिक बँकेच्या मतानुसार- " ग्रामीण विकास एक विशिष्ट वर्ग, ग्रामीण गरिब त्यात लघु व अल्प शेतकरी भुमीहीन शेतकरी यांचा समावेश आहे. ज्याची आर्थिक सामाजिक स्थितीसुधारण्याची एक संरचना आहे."

**ग्रामीण विकासाची आवश्यकता :-**

भारत देश हा विकसनशिल राष्ट्रात गणल्या जातो. भारतातील ग्ग्रमीण भागातील दारिद्र्याचे चित्र अस्वस्थ करणारे आहे. ग्रामीण कुटुंबापैकी २५ टक्के सरासरी कुटुंबाजवळ सरासरी एक एकरापेक्षाही कमी व इतर १५ टक्के कुटुंबाजवळ मुळीच जमीन नाही. याउलट ६५ टक्के जमिन १३ टक्के कुटुंबाच्या मालकिची आहे. परिणामतः हरितक्रांतीच्या नावाखाली झालेल्या सर्व सुधारणेचा फायदा जमीनदारांना किंवा श्रीमंत शेतकऱ्यांना मिळाला. उर्वरित ग्रामवासी हे दरिद्री व कर्जबाजारी राहिले आहेत. त्यामुळे फक्त पोट भरण्यापूरते उत्पादन करण्यापलीकडे त्यांची महत्वकांक्षा राहीली नाहीस्वातंत्र्यानंतर भारत देशाच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारीसरकारवर येऊन पडली. यासाठी भारत सरकारने नियोजनाचे धोरण स्वीकारले आहे. कोणत्याही प्रकारच्या विकासासाठी शेती आणि शेतीशी निगडीत व्यवसाययांची स्थिती

*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**

सुधारणे अत्यंत आवश्यक आहे. १९२८ साली रॉयल कमिशन ऑन ॲग्रीकल्चर या ब्रिटीश सरकारने नेमलेल्या कमिशननेही आपल्या अहवालात स्पष्ट केलेले आढळून आलेले आहे की, भारतातील ग्रामीण लोकांचे दारिद्र्य व गरिबी नष्ट करावयाचे असेल तर त्यासाठी शेतीत सुधारणा केल्याशिवाय गत्यंतर नाही."ग्रामीण विकास म्हणजे विशिष्ट गरजांचे एक पॅकेज नसून ग्रामीण जीवन आणि स्थितीचे रुपांतरण होय". ग्रामीण व्याप्ती बरीच व्यापक आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने एकात्मिक दृष्टीकोनाची गरज आहे. यासाठी खालील बाबींवर लक्ष केंद्रीत केले

१) लोकांमध्ये ग्रामीण विकासासंबंधी सामाजिक जाणीव वृध्दींगत केली हजे त्यामुळे शाश्वत लाभ प्राप्त होऊ शकतील.

२) सामाजिक निर्णय आणि सामाजिक कृतीद्वारे किमान गरजांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. ३) कर्तव्यदक्ष ग्रामीण नेतृत्वाची उभारणी केली पाहिजे.

४) सर्व स्तरावरील उत्पादकतावादविण्याच्या दृष्टीने विज्ञान आणि शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून योग्य तंत्रज्ञानावर भर दिला पाहिजे,

५) शेती आणि संबंधित क्षेत्राचा विकास करण्यात यावा,

६) तलाव, लहान बंधारे, कालवे यांची निर्मिती करत जल व्यवस्था सुधारणा केली पाहिजे,

७) पूरक व्यवसायाच्या मदतीने रोजगाराच्या नवीन संधी निर्माण केल्यापाहिजेत.

८) स्थानिक साधनावर आधारीत ग्रामीण आणि कुटीर उद्योगाचा विक केला पाहिजे.

९) बिगर कृषी कौशल्य विकसीत करुन सेवा क्षेत्रावर लक्ष केंद्री पाहिजे.

१०) ग्रामीण भागातील जनतेला योग्य कर्ज पुरवठा करुन त्यांना आणि विपणनाच्या दृष्टीने मदत करण्यात यावीविकासाचे प्रयत्न खालच्या पातळीपासून वरच्या पातळीपर्यंत झाले पाहिजे. विकासाचा कोणताही कार्यक्रम लोकांच्या सहभागाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही.

**ग्रामीण विकासाचे उद्देश :-**

ग्रामीणभागातील सर्वसामान्य माणसाला आर्थिक विकासाचे फायदे मिळाले पाहिजेत, त्या कोणातूनचग्रामीण विकासाची पुढीलप्रमाणे उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत.

१) ग्रामीण व शहरी भागातील विषमता दूर करणे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीयग्रामीण रोजगार हमी योजनेची(मनरेगा) योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे

३) ग्रामीण भागात अन्न सुरक्षितता कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणीकरणे

४) स्वयंरोजगाराब्दार तामीण भागातील लोकांचा आर्थिक विकास करणे.

५) ग्रामीण भागात पायाभूत संरचनेचा विकास करणे.

६) ग्रामीण भागात मूलभूत सेवांचा विकास करणे.

७) शेतजमीनीची उत्पादकता वाढविणे.

**ग्रामीण विकासाचे महत्व :**

वर्तमानकाळात भारत सरकारने ग्रामीण विकासावर आपले लक्ष केंद्रीत कले आहे. भारतातील सर्व खेड्यांतील लोकांच्या जीवनमानात वाढ झाली पाहिजे त्याकरिता भारतात नियोजनाच्या माध्यमातून पंचवार्षिक योजनांमध्ये ग्रामीण भागातील गरीबी रेषेखाली लोकोंचे जीवनमान उंचावण्याच्या हेतूने अनेक सरकारी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यातआली आहे. तरीसुद्धा ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखाली जिवनयापन करणाऱ्या लोकांची संख्या सतत वाढत गेली तसेच ग्रामीण विकासाच्या अनेक योजनांचे फायदे लोकांना मिळाले नाहीत .ग्रामीण विकासात मुख्यत: भर शेती आणि शेतीशी संलग्नित इतर कार्यावर आहे. ग्रामीण विकासात ग्राम उद्योग व वनीकरण यांचा विकास जास्त महत्वाचा आहे.

थोडक्यात ग्रामीण विकास पुढील कारणांमुळे महत्वाचा आहे.

१)अधिकतर लोकसंख्या ग्रामीण भागात राहते –

भातातील एकूण लोकसंखेच्या जवळपास १/३ लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते.सन २०१६ नुसार ६८.८४ % लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहत होती. भारतीय अर्थव्यवस्थेतग्रामीण भागाची प्रगती ही अजूनही मागासलेली आहे.

२) उपजीविकेचे मुख्य साधन शेती –

ग्रामीण भागात आजही प्रमुख उपजीविकेचे साधन म्हणून शेती हा व्यवसाय महत्त्वाचा समजला जातो भारतातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास दोन तृतीयांश लोकसंख्या ही आजही शेती व्यवसायावर अवलंबून आहे तसेच शेतीच्या विकासामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान वाढत आहे.

३)जीवनावश्यक गरजांचा अभाव-

आजही बहुसंख्य भारतातील गरीब लोक हे ग्रामीण भागात वास्तव करतात. तसेच या लोकांना अन्नधान्य आरोग्य सुविधा स्वच्छता इत्यादी जीवनातील मूलभूत गरजा अजूनही उपलब्ध होत नाहीत त्याचप्रमाणे इतर सोयीसुविधा सुद्धा त्यांना मिळत नाहीत.

४) भांडवलाचा पूरवठा- औद्यागिकीकरणासाठी लागणारे भांडवल व श्रम पुरवठा ग्रामीण क्षेत्रातून मिळते. भारत आजही मुख्यतः शेतीप्रधान आहे . विकासाच्या प्राथमिक अवस्थेत 60 टक्के ते 80 टक्के लोकसंख्या शेतीत गुंतलेली असते व 50 टक्के किंवा जादा शासकीय उत्पन्न शेती क्षेत्रात निर्माण होते.

५) अन्नधान्याचा पूरवठा-ग्रामीण क्षेत्रातील शेती क्षेत्राच्या विकासामुळे देश अन्नधान्यासारख्या अत्यंत आवश्यक अशा वस्तूंच्या वाबतील स्वयंनिर्भर होवू शकतो. अन्नधान्यासारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या बाबतीत विदेशावर अवलंबून राहिल्यास त्यामुळे कोणते राजकिय धोके असतात, हे भारताने 1950 ते 1975 पर्यंत, म्हणजे

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

ज्यावेळी फार मोठ्या प्रमाणात अमेरिकेकडून अन्नधान्य आयात करत होता, त्यावेळी अनुभवले आहे.

६) कच्च्या मालाचा पुरवठा- उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्चा माल कापूस, ताग, ऊस इ. ग्रामीण भागातील शेतीत उपलब्ध होतो. अशा प्रकारच्या कच्च्या मालाचा पूरवठा विपूल प्रमाणात झाला तरच उद्यागधंदे वाढू शकतात.

७) बाजारपेठांचा विस्तार-ग्रामीण क्षेत्रात शेती उत्पादनात होणाऱ्या वाढीमुळेग्रामीणभागातील उत्पन्न वाढत आहे . त्यामुळे औद्योगिक उत्पादनाची मागणी वाढून पर्यायाने कारखानदारीत वाढ होते.

८) किमतीतील स्थिरता- विकसनशील देशात अन्नधान्याचा पुरवठा आणिकच्चा माल यांचा पुरवठा ग्रामीण भागातून होत असते.यामुळे किंमतीतील स्थिरताराखण्यास मदत होते. अन्नधान्याचा पुरवठा जेव्हा-जेव्हा अपूरा असतो, त्या त्था वेळेस अन्नधान्याच्या किंमतीतभरमसाठ वाढ होते.

९) ग्रामीणलोकांच्या राहणीमानात वाढ – ग्रामीण भागातील शेतीउत्पादनात वाढ झाल्याखेरीज तेथील ग्रामीण लोकांचेराहणीमान वाढणे कठीण आहे. शेतीउत्पादनात पुरेशी वाढ झाली नाही तर ग्रामीण जनतेचे राहणीमान वाढविण्यासाठी वउत्पन्न वाढविण्यासाठी दुसरा पर्याय लवकर मिळू शकत नाही.

१०)मजुरांचा पुरवठा- सर्वसाधारणपणे शेतीप्रधान अप्रगत देशात शेती क्षेत्रात बेकारी, न्यून रोजगार,

हंगामी बेकारी अशा विविध प्रकारची बेकारी दिसून येते. शेतीतील जमीन, पिकांचा आकृतीबंध, भांडवली अवजारे इ. साठी आवश्यक असणाऱ्या मजूरापेक्षा अधिक मजूर शेतीत गुंतलेले दिसतात. शेतीतील एका मजुराचे काम दोन ते चार मजूर करतात.

११) शेती उद्योग- कमी उत्पन्न असणाऱ्या देशांपुढे कृषि प्रगती की औद्योगिक प्रगती असा पर्याय नसतो. ही गोन्ही क्षेत्रे एकमेकास पूरक असतात. म्हणून कृषि क्षेत्र व औद्योगिक क्षेत्र यामध्येकाही समन्वय प्रस्तापित करावे लागतात समतोल साधावे लागतात.

१२)देशाचा आर्थिक वसर्वांगीण विकास -अविकसित देशातील शेती क्षेत्राच्या विकासामुळे आणखी देशाच्या आर्थिक व सर्वांगीण विकासाला हातभार लागतो.

**नियोजन काळातील ग्रामीण विकासावरील खर्च :**

ग्रामीण विकासाच्या दृष्टीने आर्थिक नियोजन काळात सरकारने मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे तो पुढील तक्त्यामध्ये दिलेला आहे.

पंचवार्षिक योजनेतील ग्रामीण विकासावर होणारा खर्च

| पंचवार्षिक योजना | ग्रामीण विकासावरील प्रत्यक्ष खर्च (कोटी रु.) | एकूण खर्चाशी प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| ७ वी योजना (१९८५-१९९०) | १५२४७ | ७.० |

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* © 2012 IJFANS. All Rights Reserved UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

| | | |
|---|---|---|
| ८ वी योजना (१९९२-१९९७) | ४०३७२ | ८.३ |
| ९ वी योजना (१९९७-२००२) | ८८९६५ | ९.५ |
| १० वी योजना (२००२-२००७) | १६४२३ | १.० |
| ११ वी योजना (२००७-२०१२) | २८८२०९ | ७.८ |
| १२ वी योजना (२०१२-२०१७) | ४९७४६४ | ६.० |

(टीप: योजनेतील खर्चाची तरतूद )

वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या विविध पंचवार्षिक योजनेत ग्रामीण विकासावर होणारा खर्च दर्शविलेला असून सातव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी हा सन १९८५ ते १९९० असून या योजनेत ग्रामीण विकासावरील प्रत्यक्ष खर्च हा १५२४७कोटी रुपये असून एकूण खर्चाशीप्रतिशत प्रमाण हे ७ टक्के आहे.आठव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी हा सन १९९२ते १९९७ असून या योजना काळात ग्रामीण विकासावरील प्रत्यक्ष खर्च हा ४०३७२ कोटी रुपये एकूण खर्चाशी प्रतिशत प्रमाण हे ८.३ % आहे.नववी पंचवार्षिक योजनेचा कालावधी हा सन १९९७ ते २००२ असून या योजने काळात ग्रामीण विकासावरील प्रत्यक्ष खर्च हा ८८९६५ कोटी रुपये असून एकूण खर्चाशी प्रतिशत प्रमाण हे ९.५ % दिसून येते. दहाव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी हा सन २००२ ते २००७ असून या योजना काळात ग्रामीण विकासावरील प्रत्यक्ष खर्च हा १६४२३ कोटी रुपये असून एकूण खर्चाशी प्रतिशत प्रमाण हे १% दिसून येते. अकरावी पंचवार्षिक योजनेचा कालावधी हा सन २००७ ते २०१२ असून या योजनेत ग्रामीण विकासावरील प्रत्यक्ष खर्च हा २८८२०९ रुपये असून एकूण खर्चाशी प्रतिशत प्रमाण हे ७.८ % आहे. बारावी पंचवार्षिक योजनेचा कालावधी हा सन २०१२ ते २०१७ असून ग्रामीण विकासावरील प्रत्यक्ष खर्च ४५७४६४ कोटी रुपये असून एकूण खर्चाशी प्रतिशत प्रमाण हे केवळ ६%आहे.

वरील तक्त्यावरून थोडक्यात आपणास असे लक्षात येते की सुरुवातीच्या पंचवार्षिक योजना काळाच्या दरम्यान ग्रामीण विकासावरील खर्चाच्या प्रतिशत प्रमाणात हळुवारपणे वाढ होत गेलेली दिसून येते ती नव्या योजनेच्या पर्यंत आहे परंतु दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण विकासावरून विकासावरील एकूण खर्चाचे प्रतिशत प्रमाण केवळ एक टक्का म्हणजे खूपच कमी झालेले दिसून येते अकराव्या पंचवार्षिक योजनेत पुन्हा ग्रामीण विकासावरील एकूण खर्चाचे प्रतिशत प्रमाण वाढलेले असून ताराव्या पंचवार्षिक योजनेत मात्र पुन्हा ग्रामीण विकासावरील एकूण खर्चाचे प्रत्यक्ष प्रमाण हे कमी झालेले दिसून येते.

**निष्कर्ष:**

ग्रामीण विकास हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. त्याकरिता ग्रामीण विकास साधने अत्यावश्यक आहे. कोणताही विकास साधण्यासाठी कृषी आणि कृषीशी संबंधित व्यवसायांचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हाच ग्रामविकास होऊ शकतो तसेच ग्रामविकास

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

होण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे सुद्धा आवश्यक आहे आणि त्याकरिता सरकारने ग्रामविकासाकरिता विविध योजना चालवून त्या माध्यमातून ग्रामविकास शक्य आहे. ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी ग्रामीण शहरी भागातील विषमता दूर करायला हवी. त्याचप्रमाणे अन्नसुरक्षा कार्यक्रमाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. स्वयंरोजगाराद्वारे ग्रामीण जनतेचा आर्थिक विकास साध्य होणे आवश्यक आहे .ग्रामीण भागात पायाभूत संरचनेचा विकास करणे आवश्यक आहे. शेतजमीची उत्पादकता सुद्धा वाढवणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी ग्रामीण भागातील लघु आणि कुटीर उद्योग,सामाजिक आर्थिक आधारभूत संरचना, ग्रामीण मनुष्यबळ आणि सामाजिक सेवा व सवलती यावर भर दिला जातो ग्रामीण भागातील शेतमजूर ग्रामीण कारागीर यांचा त्यामुळे फायदा होतो. ग्रामीण विकासाची व्याप्ती हे कृषी व्यवसायावर सर्वात जास्त अवलंबून आहे. त्यामुळे शेती व्यवसायात सर्व प्रकारची पिके ,अन्नधान्य,डाळी इत्यादीचे उत्पादन घेण्यासाठी शेतीमध्ये जलसिंचन, भूविकास, मृदा जलसंधारण इत्यादीचा विकास करणे आवश्यक आहे. विविध पंचवार्षिक योजने दरम्यान ग्रामीण विकासावर विभिन्न प्रकारे खर्च केलेला दिसून येतो परंतु हा खर्च कमी न होता पुन्हा त्यामध्ये वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो.

**संदर्भसुची -**


१) भारतीय अर्थव्यवस्था ,डॉ. रामदास य. माहोरे, साई ज्योती पब्लिकेशन ,नागपूर.

२) https://byjus.com/commerce/meaning-of-rural-development/

३) कृषि अर्थशास्त्र, डॉ. एस. बी. कटमुसरे, पिंपळापुरे अॅड पब्लीशर्स कं

४) भारताचा आर्थिक विकास आणि नियोजन, कविमंडन विजय

५) डॉ. बी. बी. पहूरकर व एन एम. साबळे, बँकिगची तत्वे आणि ग्रामीण विकास' - 'पृष्ठ क्र. १२६

६) डॉ. जी. एम. झामरे 'भारतीय अर्थव्यवस्था विकासव पर्यावरणात्मक अर्थशास्त्र'

७) डॉ. नंदा पांगुळ-बारहाते 'भारतीय समुग्रीय विकास' आर. बी. प्रकाशन, नागपूर